# देवाचा पवित्र आत्मा आम्हांला बदलून टाकतो आणि अधिक चांगले घडवतो

**प्रार्थना:** ''प्रिय पित्या, मुलांना तुझी चांगली ओळख व्हावी यासाठी कृपा करून ह्या आभ्यासाचा उपयोग करून घे. याचा असा उपयोग करून घे जेणे करून मुले तुझ्या पवित्र आत्म्याला त्यांच्यामध्ये बदल करू देण्यास व मार्गदर्शन धेण्यास तयार होतील''

मुलांच्या गरजा आणि स्थानिक रिवाज ह्यांना अनुरूप अशा कृतींची निवड करा.

**प्रे. कृ. 6:8-15 आणि 7:51-60 हे शास्त्रभाग वाचा.** यातून ह्या पाठासाठी स्तेफनाचे हौतात्म्या ह्या वृत्तांताची तयारी करा. ख्रिस्तासाठी देवाच्या आत्म्याने स्तेफनला निर्भय साक्षीदार म्हणून कसे उभे केले, स्तेफन काय म्हणाला आणि यावर यहूदी पुढाऱ्यांची प्रतिक्रिया काय होती, हे शोधा.



हा वृत्तांत सांगण्यासाठी एका मोठया मुलाला तयार करा. मग मुलांना विचारा:

- स्तेफन हा कशा प्रकारचा माणूस होता?
- काही पुढारी मंडळी लोकांनी स्तेफन विषयी खोटे नाटे बोलावे म्हणून गुप्तपणे त्यांच्यावर दडपण आणीत होते, असे का?
- स्तेफनचा मृत्यू होण्यापूर्वी त्याचा चेहरा कसा दिसत होता?
- स्तेफनने मरण्यापूर्वी कोणाला पाहिले?
- काही लोकांना स्तेफनचा राग का आला?
- स्तेफनचे अखेरचे शब्द काय होते?

### खोटया आरोपामुळे होणारे दु:ख

- मुलांविषयी कोणी काही खोटे नाटे सांगितले असेल तर त्यांना ते आठवण्यास सांगा. एखादी गोष्ट त्यांनी केलेली नसतानाही केली म्हणून सांगितले असेल.
- असे खोटे नाटे सांगितल्यावर त्यांना काय वाटले आणि त्यांनी काय केले हेही विचारा.

स्तेफनचे हौतात्म्य ह्या वृत्तांताचे नाटयीकरण करा. नाटकाची चांगली तालीम करून उपासनेमध्ये लोकांसमोर ते सादर करा. मोठया मुलांना शौल, स्तेफन अशा भूमिका करण्यास सांगा तर लहान मुलांना वाद विवाद करणाऱ्यांची भूमिका करण्यास द्या.

**शौल:** मी प्रेषित पौल आहे. माझी ख्रिस्ताशी भेट होण्यापूर्णी मी पाहिलेल्या एका गोष्टीविषयी तुम्हांला सांगतो, तेव्हा माझे नाव 'शौल' असे होते. (वाचा प्रे. कृ. 6:8 ते 11 व्या वचनाचा पहिला भाग)

**स्तेफनः** (एका बाजूला उभे राहा)

**आरोप करणारा क्र. 1:** (रागारागाने आरडाओरडा करीत स्तेफनकडे हात दाखवून) ''स्तेफन मोशेच्या आणि देवाच्या विरूद्ध दुर्भाषण करतो असे आमच्या कानावर आमच्या कानावर आले.''

**शौल.** (वाचा प्रे. कृ. 6:12 ते 13 व्या वचनाचा पहिला भाग)

**आरोप करणारा क्र. 2** (रागारागाने आरडाओरडा करीत प्रे. कृ. 6:13-14 ह्या वचनांत नमूद केलेल्या तक्रारी मांडतो)

**शौलः** (वाचा प्रे. कृ. 6:15 व 7:1)

**स्तेफनः** (वाचा प्रे. कृ. 7:2-3 ह्या वचनातून स्तेफनचे शब्द)

**शौलः** ''स्तेफनने थोडक्यात इस्राएलाचा इतिहास सारांशरूपाने सांगितला''

**स्तेफनः** (वाचा प्रे. कृ. 7:51-52)

**शौलः** (वाचा प्रे. कृ. 7:54-55)

**स्तेफनः** (वर हात करून प्रे. कृ. 7:56 ह्या वचनातील स्तेफनचे शब्द बोला)

**आरोप करणारेः** (पळत पळत जाऊन स्तेफनला खोलीच्या दुसऱ्या बाजूला ओढत ओढत न्या)

**शौलः** (प्रे. कृ. 7:57-58 वाचा तुम्हीच ''शौल'' होता हे स्पष्ट करा.)

**आरोप करणारेः** (स्तेफनवर दगड फेकण्याची कृती करा.

**स्तेफनः** प्रे. कृ. 7:59-60 मधील स्टीफनाचे शब्द वाचा.

पवित्र आत्म्याने स्तेफनला कशा प्रकारे सामर्थ्य दिले याविषयी मुलांनी तयार केलेल प्रश्न त्यांना मोठया माणसांना विचारायला सांगा त्यांना भाग 1 मधील प्रश्नांचा उपयोग करता येईल.

**कविता.** यशया 61:1-2 ह्या वचनांमधील तीन भाग तोंडपाठ म्हणण्याची तीन मुलांकडून तयारी करून घ्या. ही वचने त्यांना मोठया माणसांसमोरही तोंडपाठ म्हणता येतील.

प्रभु परमेश्वराचा आत्मा मजवर आला आहे,<br>
  कारण दीनांस शुभवृत्त सांगण्यास परमेश्वराने<br>
मला अभिषेक केला आहे.<br>
  भग्न हृदयी जनांस पट्टी बांधावी, धरून<br>
नेलेल्यास मुक्तता व बंदिवानांस<br>
  बंधमोचन विदित करावे<br>
परमेश्वराच्या प्रसादाचे वर्ष व आमच्या<br>
देवाचा सूड धेण्याचा दिवस विदित करावा,<br>
  सर्व शोकग्रस्तांचे सांत्वन करावे,

पवित्र आत्म्याचे कार्य उदाहरण देऊन स्पष्ट करा.

- पवित्र आत्मा काय कार्य करतो हे दाखवण्यासाठी मुलांना तुटलेल्या साखळीचे चित्र काढायला सांगा.
- मुलांना हे चित्र मोठया माणसांना दाखवायला सांगा तसेच पवित्र आत्मा आम्हांला देवाच्या सामर्थ्याने पूर्ण करतो आणि आम्हांला पातक, दुष्टपणा व मरणाचे भय यासारख्या साखळयांच्या बंधनातून सोडवतो हे स्पष्ट करून सांगण्यास सांगा.



**पाठ करा** योहान 20:22 आणि मोठया मुलांना इफिस 1:13-14 ही वचने पाठ करण्यास सांगा.

**स्पष्ट करा** आत्म्याची फळे वाचा गलती 5:19-25

पुढे एक तक्ता दिला आहे. त्याचा उपयोग करून देहाची वाईट कर्मे (पापी कृत्ये) आणि नंतर पवित्र आत्मा आमच्या ठायी निर्माण करीत असलेले सद्‌गुण ही उदाहरणे स्पष्ट करा.

**देहाची कर्मे आणी आत्म्याची फळे**

| | |
|---|---|
| **देहाची कर्मे: पापामुळे लोकांना दुष्ट वाईट गोष्टी कराव्यात असे वाटते गलती 5:19-21** | **आत्म्याची फळे: पवित्र आत्मा आम्हांला चांगल्यागोष्टी करण्यास सहाय्य करतो, गलती 5:22-23** |
| **लैंगीक अनैतिकता दावीदाला दुसऱ्या माणसाची बायको हवीशी वाटली.** | **प्रीती दावीदाने पश्चाताप केला, देवावर मनापासून प्रेम केले 2 शमुवेल 11; स्तोत्र 51** |
| **अशुद्धता, बाहेरख्यालीपणा, उधळया पुत्र वाईट रितीने जीवन जगला.** | **आनंद-त्याने पश्चाताप केला व तो घरी परतला तेव्हा त्याला आनंद झाला लूक 15:11-32** |
| **मूर्तीपूजा, चेटूक, एज्राच्या लोकांनी दगडी मूर्तीपासून शांती मिळवण्याचा प्रयत्न केला.** | **शांती एज्राने आपल्या यहूदी बांधवांना देवामध्ये शांती शोधण्यास सहाय्य केले. एज्रा 9** |
| **द्वेष शौलाने विश्वासणाऱ्यांचा द्वेष करून त्यांचा छळ केला.** | **सहनशीलता वाईट वागणूकीला खंबीरपणे तोंड देण्यास शौल शिकला प्रे. कृ. 9** |
| **हेवा, मत्सर-यहूदाने मत्सर वाटून आपल्या भावाला योसेफला गुलाम म्हणून विकून टाकले.** | **दयाळूपणा-नंतर पुढे यहूदाने मोठा दयाळूपणा दाखवला उत्पत्ती 37 व 44** |
| **रागाचे-झटके. आपल्या शत्रूंचा नाश व्हावा यासाठी योहानाला अग्नी हवा होता.** | **चांगुलपणा-नंतर पुढे योहानाने बराच चांगुलपणा दखवला योहान 9:54** |
| **स्वार्थी महत्वाकांक्षा एसावाचा वारसा मिळावा म्हणून याकोबाने त्याला फसवले.** | **विश्वास सहाय्य मिळावे यासाठी याकोब देवावर विश्वास ठेवायला शिकला उत्पत्ती 25:29-34 व अध्याय 27 व 47** |
| **कलह, तट, हेवा अत्युंखिया मधील विश्वासणाऱ्या मध्ये फूट पडली.** | **सौम्यता अत्युंखिया मधील विश्वासणाऱ्यामध्ये ऐक्य निर्माण झाले प्रे. कृ. 15** |
| **दारूबाजी, गोंधळ-करिंथकरांच्या अंगी हे अवगुण होते** | **आत्मसंयमन पवित्र आत्म्याने करिंथकरांना धुऊन शुद्ध केले. 1 करिंथ 6:9-11** |

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net